आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

४ डिसेंबर २०२५ - गुरूवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- तंबाखू आणि तत्सम वस्तूंवर अतिरीक्त उत्पादन शुल्क लादणाऱ्या विधेयकाला संसदेची मंजुरी

- महसूल विभागाच्या वेबसाइटवरुन १५ रुपयात काढता येणार डिजिटल सातबारा

- संभाव्य दुबार मतदारांचा काटेकोर शोध घेण्याचे राज्य निवडणूक आयुक्तांचे महापालिकांना आदेश

आणि

- चौसष्टाव्या महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धेचे विविध केंद्रांवरचे निकाल जाहीर

**<><><><><>**

केंद्रीय उत्पादन शुल्क सुधारणा विधेयकाला आज संसदेची मंजुरी मिळाली. यामुळं तंबाखू आणि तंबाखू जन्य पदार्थांवर जीएसटी अधिभार रद्द झाल्यावर अतिरीक्त उत्पादन शुल्क लादण्याचा मार्ग मोकळा होईल.

सिगारेटवर अतिरीक्त शुल्क लादल्यानंतर मिळणारा अतिरीक्त महसूल वित्त आयोगाच्या शिफारशींनुसार राज्यांनाही दिला जाईल असं आश्वासन केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी राज्यसभेत या विधेयकावरच्या चर्चेला उत्तर देताना दिलं. अधिकाधिक शेतकऱ्यांनी तंबाखू ऐवजी इतर पीकांची लागवड करावी यासाठी सरकारनं विविध योजना आणल्या आहेत. यामुळं महाराष्ट्रासह विविध राज्यातल्या शेतकऱ्यांनी १ लाख हेक्टरहून अधिक जागेवर इतर पीकं लावायला सुरुवात केल्याचं त्या म्हणाल्या.

लोकसभेत आज आरोग्य आणि राष्ट्रीय सुरक्षा अधिभार विधेयकावर चर्चा झाली. पानमसाला आणि इतर जीवनावश्यक वस्तूंवर हा अधिभार लावण्याचा सरकारचा विचार आहे. यातून येणारा महसूल आरोग्य योजनांवर खर्च करण्यासाठी राज्यांनाही दिला जाईल.

**<><><><><>**

महसूल विभागाच्या bhulekh.mahabhumi.gov.in या वेबसाइटवरुन डिजिटल स्वरुपात सातबारा काढता येणार आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या निर्णयाची

अंमलबजावणी करण्याचे आदेश सर्व संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत. डिजिटल स्वाक्षरीने मिळणारा गावनमुना सातबारा, आठ अ आणि फेरफार उतारे हे सर्व शासकीय, निमशासकीय तसंच बँकिंग, कर्जप्रक्रिया, न्यायालयीन कामकाजासाठी पूर्णपणे वैध असतील. यासाठी १५ रुपये शुल्क आकारलं जाणार आहे.

<><><><><>

गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह योजनेचा लाभ शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट जमा होणार आहे. महाडीबीटी पोर्टल शेतकऱ्यांना ही मदत तत्काळ मिळणार असल्याची माहिती कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली. पूर्वी ऑफलाइन स्वीकारल्या जाणाऱ्या अर्जांची प्रक्रिया आता पूर्णपणे डिजिटल करण्यात आली असल्याचे त्यांनी सांगितले. याअंतर्गत चालू आर्थिक वर्षात ४ हजार ३५९ लाभार्थ्यांना ८८ कोटी १९ लाख रुपयांचं वाटप झालं आहे.

शेतीत काम करताना होणाऱ्या अपघातांमुळे मृत्यू किंवा अपंगत्व आलेल्या शेतकऱ्यांना या योजनेतून अनुदान दिलं जातं. या योजनेत शेतकऱ्याचा अपघाती मृत्यू झाल्यास २ लाख रुपये तर एक डोळा किंवा एक अवयव कायमस्वरूपी निकामी झाल्यास १ लाख रुपयांची मदत दिली जाते.

<><><><><>

महानगरपालिका निवडणुकांच्या मतदार याद्यांमधल्या संभाव्य दुबार मतदारांचा काटेकोर शोध घेण्याचे आदेश राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी दिले आहेत. राज्यातल्या सर्व महानगरपालिका आयुक्तांची आज दूरस्थ पद्धतीने बैठक घेण्यात आली. या बैठकीत वाघमारे यांनी हे आदेश दिले आहेत. प्रारुप मतदार याद्यांवरच्या हरकती आणि सूचनांची पडताळणी करून वेळेवर निपटारा करावा, प्रभागनिहाय मतदार यादी तयार करताना झालेल्या चुका निदर्शनाला आल्या तर तक्रारींची वाट न पाहता त्या दुरुस्त कराव्यात असे निर्देशही आयुक्तांनी दिले आहेत. दुबार नाव असलेल्या मतदारांना आवाहन करून त्यांच्याकडून विहित नमुन्यात अर्ज भरून घ्यावा तसंच आवाहनाला प्रतिसाद न देणाऱ्या मतदारांकडून मतदानाच्या दिवशी हमीपत्र लिहून घ्यावं, असे निर्देशही वाघमारे यांनी दिले आहेत.

<><><><><>

देशात यंदा ३ कोटी १५ लाख टन साखर उत्पादन होईल, असा अंदाज राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघानं वर्तवला आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत यावर्षी त्रेपन्न लाख टन जास्त उत्पादन होणार आहे. अतिरिक्त साखर गोदामात पडून राहू नये यासाठी १० लाख टन साखर निर्यातीला परवानगी द्यावी, अशी मागणी, साखर महासंघानं केंद्र सरकारकडे केली आहे.

**<><><><><>**

प्रलंबित प्रश्न मार्गी लागावे यासाठी राज्यभरातील बाजार समित्या उद्या शुक्रवारी बंद राहणार आहेत. महाराष्ट्र राज्य व्यापारी कृती समितीच्या वतीने हा बंद पुकारण्यात आला आहे. बाजार समिती कायदा कालबाह्य झाल्यामुळे बाजार समिती कायदाच रद्द करून सर्वांना व्यापाराची खुली परवानगी द्यावी, कृषी उत्पन्न बाजार समिती आकारत असलेला सेंस रद्द करावा अशा व्यापाऱ्यांच्या मागण्या आहेत. मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारातील मसाला आणि दाणा मार्केट उद्या बंद राहणार आहे तर कांदा बटाटा आणि भाजीपाला मार्केट सुरू राहणार असल्याची माहिती व्यापारी प्रतिनिधींनी दिली.

सोलापूरसह जिल्ह्यातल्या ११ बाजार समित्यांमधले सुमारे ६ हजार व्यापारी या बंदमध्ये सहभागी होणार आहेत, अशी माहिती भुसार आडत व्यापारी संघानं दिली.

**<><><><><>**

चौसष्टाव्या महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धेचे विविध विभागांमधले निकाल जाहीर झाले आहेत. या स्पर्धेत मुंबई केंद्रातून 'ती, ती आणि ती' या नाटकाला प्रथम पारितोषिक जाहीर झालं आहे. नाशिक केंद्रातून 'काळाच्या पंजातून' या नाटकाला, सांगली केंद्रातून 'तिचे संदर्भ नसलेली गोष्ट' या नाटकाला तर लातूर विभागातून 'दास्तान' या नाटकाला प्रथम पारितोषिक मिळालं आहे. सिंधुदुर्ग केंद्रातून 'सूनबाई तोऱ्यात' या नाटकाला, सातारा केंद्रातून 'पोकळ घिस्सा' या नाटकाला तर नांदेड केंद्रातून 'संपूर्ण' या नाटकाला प्रथम पारितोषिक जाहीर झालं आहे. चंद्रपूर केंद्रातून 'तांडा' या नाटकाला, अमरावती केंद्रातून 'वारकरी' या नाटकाला तर पिंपरी चिंचवड केंद्रातून 'सखा' या नाटकाला प्रथम क्रमांक मिळाला आहे.

**<><><><><>**

शेतकऱ्यांसाठी सुरू केलेल्या सौर पॅनल्स आणि कृषीपंप असा संपूर्ण संच देण्याच्या 'मागेल त्याला सौर कृषीपंप' या योजनेत राज्याने विश्वविक्रम केला आहे. महावितरणने एकाच महिन्यात ४५ हजार ९११ सौरकृषीपंप स्थापन करण्याचा उच्चांक केला आहे. या विश्वविक्रमाची गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद झाली आहे. गिनिज बुकतर्फे विश्वविक्रम प्रमाणपत्र प्रदान सोहळा उद्या सकाळी दहा वाजता छत्रपती संभाजीनगरात ऑरिक सिटी मैदानावर आयोजित करण्यात आला आहे.

<><><><><>

तेविसाव्या भारत-रशिया वार्षिक शिखर परिषदेसाठी रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन थोड्याच वेळापूर्वी नवी दिल्लीत पोहोचले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी विमानतळावर त्यांचं स्वागत केलं.

त्यापूर्वी दोन्ही देशांच्या संरक्षण, अर्थ, व्यापार मंत्र्यांमध्ये आज नवी दिल्लीत शिष्टमंडळ स्तरीय चर्चा झाली.

<><><><><>

दत्तजयंतीच्या निमित्तानं नंदुरबार जिल्ह्यातल्या प्रसिद्ध सारंगखेडा इथल्या एकमुखी दत्तमंदिरात आज भाविकांची दर्शनासाठी मोठी गर्दी झाली आहे. या यात्रोत्सवात घोडे बाजारासोबतच शेती आणि गृहोपयोगी साहित्याचा मोठा बाजार भरतो. याठिकाणच्या घोडे बाजाराला चालना देण्यासाठी इथं चेतक उत्सवाचं आयोजन गेल्या काही वर्षांपासून केलं जात आहे.

<><><><><>

मध्य रेल्वेवरच्या १३ दुरांतो, वंदे भारत आणि राजधानी गाड्यांमधल्या तत्काळ तिकिटांच्या आरक्षणासाठी शनिवारपासून ओटीपी आवश्यक असेल. तिकिट खिडकी किंवा IRCTC वरुन तिकिट आरक्षित करताना दिलेल्या मोबाइलवर ओटीपी पाठवला जाईल. त्याची पडताळणी झाल्यावर तत्काळ तिकिट काढता येईल. यामुळं पारदर्शकता वाढेल आणि पात्र प्रवाशांनाच तत्काळ तिकिट मिळेल, असं मध्य रेल्वेनं म्हटलं आहे.

<><><><><>

भारतीय डाक विभागानं नागरिकांची पत्रं आणि पार्सल जलद गतीने पोहोचवण्यासाठी आपल्या ताफ्यात दोनशे इलेक्ट्रिक दुचाकींचा समावेश केला आहे. आज मुंबईच्या चकाला

इथल्या पोस्ट ऑफिसमध्ये या सेवेचा आरंभ करण्यात आला.  या इलेक्ट्रिक दुचाकींच्या माध्यमातून जीपीओ, चकाला, शीव, दादर आणि काळबादेवी इथल्या पोस्ट ऑफिसमधून या भागातली सर्व प्रकारची पत्रं आणि पार्सल पोहोचवण्यात येणार आहेत.

**<><><><><>**

भारतीय मानक ब्युरोच्या मुंबई शाखेनं आज अंधेरी उपनगराच्या पश्चिम भागात एका दुकानावर छापा टाकून प्रमाणित नसलेले ६४ अॅडॉप्टर्स जप्त केले. मानक चिन्हांचा गैरवापर होत असल्याची माहिती मिळाल्यावर छापा टाकण्यात आला.

**<><><><><>**

न्यूमोनिया प्रतिबंधासाठी रत्नागिरी जिल्ह्यात १२ नोव्हेंबर २५ ते २८ फेब्रुवारी २६ या कालावधीत सांस ही मोहीम राबवली जाणार आहे. या मोहिमेंतर्गत आरोग्य कर्मचारी आणि आशा स्वयंसेविका घरोघरी भेट देऊन ० ते पाच वर्षं वयोगटातल्या बालकांची आरोग्य तपासणी करणार आहेत. न्यूमोनियाची लक्षणं आढळल्यास त्या व्यक्तीला ताबडतोब प्राथमिक उपचार आणि आरोग्य सेवा उपलब्ध करून दिली जाणार आहे. शून्य ते पाच वर्षं वयोगटातल्या प्रत्येक बालकाचं न्यूमोनियापासून रक्षण करणं हे या उपक्रमाचं उद्दिष्ट आहे.

**<><><><><>**

गेल्या २४ तासात विदर्भात तुरळक ठिकाणी किमान तापमानात लक्षणीय घट झाली. येत्या दोन दिवसात राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहिल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**//<><><><><>//**